# महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

## Maharashtra Industrial Development Corporation

(A Government of Maharashtra Undertaking)

मुख्य कार्यालय : "उद्योग सारथी", महाकाली गुंफा मार्ग, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०० ०९३. प्रिन्सिपल कार्यालय : ४,४ (ऐ) १२ वा मजला, वर्ल्ड ट्रेड सेंटर, सेंटर-१, कफ परेड, मुंबई ४०० ००५.

Head Office : "Udyog Sarathi", Mahakali Caves Road, Andheri (East), Mumbai 400 093.
Principle Office : 4,4 (A), 12th Floor, World Trade Centre-1, Cuffe Parade, Mumbai-400 005.

☎:०२२-४७४८८३१२, ४७४८४६७९/९९
☎: +९१-०२२-४०१६१४५१/५४ (022-40161451/54)

www.midcindia.org


जा.क्र. मऔविम/म.व्य.(भूमी)/ P16038 दिनांक: 02/01/2025

## परिपत्रक

**विषय: भूखंड वाटप समितीचे पुनर्गठन करणेबाबत.**

संदर्भ: (१) परिपत्रक क्रमांक मऔविम/भूविभाग/डी-१४५०२, दिनांक २६.०९.२०१६
(२) परिपत्रक क्रमांक मऔविम/मव्य(भूमी)/ई-९६१४, दिनांक २०.०६.२०२३
(३) शुध्दीपत्रक क्रमांक मऔविम/मव्य(भूमी)/पी-३४४२७, दिनांक २१.०६.२०२३

महामंडळाने विकसीत केलेल्या विविध औद्योगिक क्षेत्रातील आरेखीत भूखंडाचे वाटप एमआयडीसी डिस्पोजल ऑफ लँड रेग्युलेशन्स १९७५ मधील तरतुदीप्रमाणे तसेच महामंडळाच्या सदस्य मंडळाच्या बैठकीत वेळावेळी ठरावाद्वारे घेतलेल्या निर्णयानुसार / प्रशासकीय निर्णयानुसार प्रसिध्द करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वाप्रमाणे करण्यात येते. ज्या औद्योगिक क्षेत्रांमध्ये ८० टक्केपेक्षा जास्त भूखंड / वाटपायोग्य क्षेत्राचे वाटप झाले आहे, अशा औद्योगिक क्षेत्रामध्ये उर्वरीत भूखंड / वाटपायोग्य क्षेत्राचे वाटप निविदा पध्दतीने करणेबाबत तसेच ज्या औद्योगिक क्षेत्रांमध्ये ८० टक्केपेक्षा कमी भूखंड / भूखंड वाटपायोग्य क्षेत्राचे वाटप झाले आहे, अशा औद्योगिक क्षेत्रामध्ये ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागवून भूखंड / क्षेत्र वाटप करणेबाबत त्याचप्रमाणे प्राधान्य सदराखाली व उद्योग विस्ताराकरिता भूखंडाचे वाटप करणेबाबत महामंडळाच्या क्रमांक मऔविम/भूविभाग/डी-१४५०२, दिनांक २६.०९.२०१६ रोजीच्या परिपत्रकान्वये सुधारीत धोरण निर्गमीत करण्यात आले आहे. तथापि, सदर परिपत्रकातील परिशिष्ट ५ मध्ये भूखंड / शेड / गाळा वाटप व हस्तांतर इत्यादिबाबत अधिकारांमध्ये सुसुत्रता आणणेसंदर्भात वेळोवेळी सुधारणा करण्यात आल्या आहेत.

त्याअनुषंगाने परिपत्रक क्रमांक मऔविम/मव्य(भूमी)/ई-९६१४, दिनांक २०.०६.२०२३ अन्वये क्षेत्रफळावर आधारीत भूखंड / शेड / गाळा वाटपासाठी भूखंड वाटप समित्यांचे गठण करण्यात आलेले आहे. तथापि, दिनांक २०.०६.२०२३ रोजीच्या



For any requirements related to MIDC, please call us at +91 98338 32485 or email us at info@midcconsultants.in

midcconsultants.in

परिपत्रकामध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता असल्याने पुढीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे. तसेच संदर्भ क्रमांक (२) व (३) येथील परिपत्रके रद्द करण्यात येत आहेत.

### भूखंड वाटप समितीचे सदस्य

| अ.क्र. | भूखंड वाटप समिती | भूखंड वाटप समितीचे सदस्य | | |
|---|---|---|---|---|
| १. | मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखालील भूखंड वाटप समिती | १) | मुख्य कार्यकारी अधिकारी | अध्यक्ष |
| | | २) | सह मुख्य कार्यकारी अधिकारी (संबंधीत) | उपाध्यक्ष |
| | | ३) | उप मुख्य कार्यकारी अधिकारी (संबंधीत) | सदस्य |
| | | ४) | मुख्य अभियंता (मुख्यालय) | सदस्य |
| | | ५) | मुख्य नियोजक | सदस्य |
| | | ६) | उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पर्यावरण) | सदस्य |
| | | ७) | तांत्रिक सल्लागार | सदस्य |
| | | ८) | महाव्यवस्थापक (भूमी) | सदस्य सचिव |
| २. | सह मुख्य कार्यकारी अधिकारी (प्रशासन) यांचे अध्यक्षतेखालील भूखंड वाटप समिती (कार्यासन-१ — कोकण विभाग) | १) | सह मुख्य कार्यकारी अधिकारी (प्रशासन) | अध्यक्ष |
| | | २) | उप मुख्य कार्यकारी अधिकारी (संबंधीत) | उपाध्यक्ष |
| | | ३) | मुख्य अभियंता (मुख्यालय) | सदस्य |
| | | ४) | मुख्य नियोजक | सदस्य |
| | | ५) | उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पर्यावरण) | सदस्य |
| | | ६) | तांत्रिक सल्लागार | सदस्य |
| | | ७) | महाव्यवस्थापक (भूमी) | सदस्य सचिव |
| ३. | सह मुख्य कार्यकारी अधिकारी (प्रशासन) यांचे अध्यक्षतेखालील भूखंड वाटप समिती (कार्यासन-३ - नाशिक व औरंगाबाद विभाग) | १) | सह मुख्य कार्यकारी अधिकारी (प्रशासन) | अध्यक्ष |
| | | २) | उप मुख्य कार्यकारी अधिकारी (संबंधीत) | उपाध्यक्ष |
| | | ३) | मुख्य अभियंता (मुख्यालय) | सदस्य |
| | | ४) | मुख्य नियोजक | सदस्य |
| | | ५) | उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पर्यावरण) | सदस्य |
| | | ६) | तांत्रिक सल्लागार | सदस्य |
| | | ७) | महाव्यवस्थापक (भूमी) | सदस्य |
| | | ८) | व्यवस्थापक, भूविभाग, कार्यासन-३ | सदस्य सचिव |
| ४. | सह मुख्य कार्यकारी अधिकारी (विदर्भ) यांचे अध्यक्षतेखालील भूखंड वाटप समिती (कार्यासन-२ - पुणे विभाग) | १) | सह मुख्य कार्यकारी अधिकारी (विदर्भ) | अध्यक्ष |
| | | २) | उप मुख्य कार्यकारी अधिकारी (संबंधीत) | उपाध्यक्ष |
| | | ३) | मुख्य अभियंता (मुख्यालय) | सदस्य |
| | | ४) | मुख्य नियोजक | सदस्य |
| | | ५) | उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पर्यावरण) | सदस्य |
| | | ६) | तांत्रिक सल्लागार | सदस्य |
| | | ७) | महाव्यवस्थापक (भूमी) | सदस्य सचिव |



midcconsultants.in
For any requirements related to MIDC, please call us at +91 98338 32485 or email us at info@midcconsultants.in

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५. | सह मुख्य कार्यकारी अधिकारी (विदर्भ) यांचे अध्यक्षतेखालील भूखंड वाटप समिती (कार्यासन-४ - विदर्भ विभाग) | १) | सह मुख्य कार्यकारी अधिकारी (विदर्भ) | अध्यक्ष |
| | | २) | उप मुख्य कार्यकारी अधिकारी (संबंधीत) | उपाध्यक्ष |
| | | ३) | मुख्य अभियंता (मुख्यालय) | सदस्य |
| | | ४) | मुख्य नियोजक | सदस्य |
| | | ५) | उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पर्यावरण) | सदस्य |
| | | ६) | तांत्रिक सल्लागार | सदस्य |
| | | ७) | महाव्यवस्थापक (भूमी) | सदस्य |
| | | ८) | व्यवस्थापक, भूविभाग, कार्यासन-४ | सदस्य सचिव |
| ६. | उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखालील भूखंड वाटप समिती | १) | उप मुख्य कार्यकारी अधिकारी | अध्यक्ष |
| | | २) | महाव्यवस्थापक (भूमी) | उपाध्यक्ष |
| | | ३) | प्रादेशिक अधिकारी (संबंधीत) | सदस्य |
| | | ४) | अधिक्षक अभियंता (संबंधीत) | सदस्य |
| | | ५) | सहयोगी रचनाकार (संबंधीत) | सदस्य |
| | | ६) | तांत्रिक सल्लागार यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| | | ७) | उप मु.का.अ.(पर्यावरण) यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| | | ८) | क्षेत्र व्यवस्थापक (कार्यासन-१/२/३/४) | सदस्य सचिव |
| ७. | प्रादेशिक अधिकारी यांचे अध्यक्षतेखालील भूखंड वाटप समिती | १) | प्रादेशिक अधिकारी | अध्यक्ष |
| | | २) | महाव्यवस्थापक (जि.उ.कें.) (संबंधीत) | सदस्य |
| | | ३) | कार्यकारी अभियंता (संबंधीत) | सदस्य |
| | | ४) | उप रचनाकार (संबंधीत) | सदस्य |
| | | ५) | प्रादेशिक अधिकारी / उप प्रादेशिक अधिकारी (MPCB) (संबंधीत) | सदस्य |
| | | ६) | संबंधित क्षेत्र व्यवस्थापक | सदस्य सचिव |

महामंडळाच्या विविध औद्योगिक क्षेत्रामध्ये भूखंड / शेड / गाळा वाटपासाठी प्राप्त झालेले अर्ज भूखंड वाटप समितीसमोर सादर करताना खालीलप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

(१) अर्जदाराकडुन भूखंड / शेड / गाळा वाटपासाठी अर्ज प्राप्त झाल्यानंतर संबंधीत प्रादेशिक कार्यालयाने दिनांक २६.०९.२०१६ तसेच क्रमांक मऔविम/तां.स./डी-४२३१६, दिनांक १३.१०.२०२२ रोजीच्या परिपत्रकातील परिशिष्ट-१ मध्ये नमूद केल्यानुसार प्राप्त अर्जाची (सविस्तर प्रकल्प अहवाल, मागणी केलेल्या जागेच्या वापराचा तपशिल, प्रस्तावित बांधकामाचा नकाशा, गुंतवणूक, आर्थिक क्षमता, पर्यावरण विषयक मंजुऱ्या, इत्यादि) परिपूर्ण छाननी करुन जागा उपलब्धतेबाबत स्वयंस्पष्ट अभिप्रायासह सविस्तर पात्र प्रस्ताव सादर करावा.



For any requirements related to MIDC, please call us at +91 98338 32485 or email us at info@midcconsultants.in

(२) मुख्यालयीन स्तरावर भूखंड वाटपासाठी प्रादेशिक कार्यालयाकडुन प्राप्त प्रस्तावांची संबंधीत कार्यासनामार्फत छाननी करुन अपात्र प्रस्ताव निकाली काढून पात्र प्रस्तावावर नियोजन विभाग, अभियांत्रिकी विभाग, पर्यावरण विभाग व तांत्रिक सल्लागार यांचे अभिप्राय प्राप्त करावेत. तसेच, सदर प्रस्तावास महामंडळाच्या क्रमांक मऔविम/भूविभाग/डी-१४५०२, दिनांक २६.०९.२०१६ रोजीच्या परिपत्रकानुसार सक्षम स्तरावरुन मान्यता घेऊन प्रस्ताव भूखंड वाटप समितीच्या निर्णयार्थ सदस्य सचिवांकडे सादर करावेत.

(३) मुख्यालयीन स्तरावर सदस्य सचिव यांनी भूखंड वाटप समितीच्या बैठकीसमोर सादर करावयाच्या प्राप्त प्रस्तावांची सुचि (Agenda) तयार करुन कार्यक्षेत्राप्रमाणे अध्यक्ष, भूखंड वाटप समिती यांचे मान्यतेने भूखंड वाटप समितीची बैठक प्रत्येक आठवड्यातील गुरुवारी किंवा आवश्यकतेनुसार अध्यक्षांच्या परवानगीने इतर दिवशी आयोजित करावी.

(४) सह मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखालील बैठकीच्या इतिवृत्ताचा मसुदा संबंधीत कार्यासनाने सदस्य सचिव यांचेकडे सादर करावा. सदस्य सचिव यांनी बैठकीच्या अंतिम इतिवृत्तावर सर्व समिती सदस्यांची स्वाक्षरी घेऊन सदर इतिवृत्त महामंडळाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.

(५) उप मुख्य कार्यकारी अधिकारी व प्रादेशिक अधिकारी यांचे अध्यक्षतेखालील बैठकीच्या इतिवृत्ताचा मसुदा संबंधीत कार्यासनाने सदस्य सचिव यांचेकडे सादर करावा. सदस्य सचिव यांनी बैठकीच्या अंतिम इतिवृत्तावर सर्व समिती सदस्यांची स्वाक्षरी घेऊन सदर इतिवृत्त संबंधीत सह मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेस्तव सादर करावे. सदर इतिवृत्तास संबंधीत सह मुख्य कार्यकारी अधिकारी यांची मान्यता प्राप्त झाल्यानंतर सदस्य सचिव यांनी सदर इतिवृत्त महामंडळाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.

(पी. वेलरासू, भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
मऔविम, मुंबई



midcconsultants.in
For any requirements related to MIDC, please call us at +91 98338 32485 or email us at info@midcconsultants.in

प्रत:

(१) सर्व विभाग प्रमुख, मऔविम, मुंबई.

(२) अतिरीक्त मुख्य अभियंता, मऔविम, पुणे / छत्रपति संभाजीनगर / नागपूर

(३) महाव्यवस्थापक (भूमी / विधी / भूसंपादन / मा व तं / जनसंपर्क / म.ब.वि. / डीएमआयसी / पणन)

(४) सर्व अधिक्षक अभियंता, मऔविम,

(५) सर्व प्रादेशिक अधिकारी, मऔविम,

(६) सर्व कार्यकारी अभियंता, मऔविम,

(७) सह / उप मुख्य लेखा अधिकारी, मऔविम, मुंबई / पुणे / छत्रपति संभाजीनगर / नागपूर.

(८) सर्व महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र,

(९) सर्व औद्योगिक संघटना

(१०) मुख्य मध्यवर्ती परिपत्रक नस्ती / मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम, कार्यालय मरोळ / जागतिक व्यापार केंद्र, मुंबई.



For any requirements related to MIDC, please call us at +91 98338 32485 or email us at info@midcconsultants.in

midcconsultants.in